Impact:4

Date: 27/09/25

News: Jansatya

दैनिक जनसत्य
नि:पक्ष नजर... नि:पक्ष खबर...

# मोडनिंब येथे 'स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान'



**मोडनिंब :** भाजप महिला आघाडीच्या पुढाकारातून प्राथमिक आरोग्य केंद्र, मोडनिंब येथे स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान मोठ्या उत्साहात पार पडले. महिलांच्या आरोग्यविषयक जागरूकतेसह सायबर गुन्हेगारीसंबंधी मार्गदर्शन हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. या वेळी तालुका अध्यक्षा अर्चना सावंत, उपाध्यक्षा रोहिणी मोहिते, शहराध्यक्षा मनीषा गिड्डे, शहर सरचिटणीस कुसुम जाडकर यांच्यासह भाजपचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सर्व आशा वर्कर आणि शहरातील महिलावर्गानेही सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. थोरात यांनी करताना महिलांच्या आरोग्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. डॉ. शेंडगे मॅडम यांनी महिलांना आरोग्यविषयक आजार व त्यावरील काळजीविषयी मार्गदर्शन केले. तर अमृता माळी यांनी महिलांना सायबर गुन्हेगारीपासून सावध राहण्याचे मार्गदर्शन केले. या अभियानात महिलांच्या आरोग्याचे रक्षण, संतुलित आहार, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच डिजिटल सुरक्षिततेविषयी सखोल चर्चा झाली.